(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९९] सप्प. ४ एस. सी. आर. २६०

**स्टेट ऑफ महाराष्ट्र**

*- विरुद्ध -*

**केशव रामचंद्र पंगारे आणि अन्य**

*१ नोव्हेंबर, १९९९*

[के. टी. थॉमस आणि एम. बी. शाह, न्यायमूर्ती]

दंड संहिता, १८६०/ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७/ फौजदारी *प्रक्रिया संहिता, १९७३ / महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ : कलम १२०-बी, ४०६, ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७७ व १०९ / कलम ५(१)(डी) व ५(२) / कलम ४, ४६८(२) व ४७०(३) / नियम २७ (३) - उत्तरवादीवर त्याच्या निवृत्तीनंतर भ्रष्टाचार, गैरव्यवहार इत्यादींच्या गुन्ह्यांचा आरोप - गुन्हा केल्याच्या चार वर्षांनंतर दखल घेतली - मंजुरी प्राप्त - उत्तरवादीने कार्यवाहीला रिट द्वारे आव्हान दिले - निवृत्तिवेतन नियम २७ अंतर्गत संरक्षण, गुन्हे केल्यानंतर चार वर्षे संपल्याच्या आधारावर मागितले - रीट पिटिशन मंजूर केले आणि संपूर्ण कार्यवाई रद्द केली - अपीलवर, असा निर्णय देण्यात आला कि : निवृत्तिवेतन नियम २७ हा निवृत्तिवेतन रोखून ठेवण्याचा किंवा काढून घेण्याच्या सरकारच्या अधिकाराच्या संदर्भात आहे - नियम २७, फौ. प्र. सं. अंतर्गत फौजदारी खटलयावर परिणाम करत नाही - फौ. प्र. सं. मध्ये तीन वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा होऊ शकणाऱ्या गुन्ह्यासाठी मुदतमर्यादेचा कालावधी नाही - मंजुरी मिळवण्यासाठी लागणारा वेळ वगळण्यात आला आहे - उत्तरवादी विरुद्ध खटला मुदतमर्यादे बाहेर नाही - सेवा कायदा.*

**महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी करणारा उत्तरवादी क्र. १ १९८७ मध्ये सेवेतून निवृत्त झाला. १९९० मध्ये, आर-१ आणि इतर काही जणांवर भा. दं. वि. चे कलम १२०-बी, ४०६, ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७७ व १०९ सोबत भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ चे कलम ५(१)(सी) सह ५(२) अंतर्गत गुन्ह्यांसाठी आरोपपत्र दाखल करण्यात आले.**

मंजुरी मिळाल्यानंतर, विशेष न्यायालयाने दखल घेतली आणि आदेशिका जारी केली. ही तक्रार गुन्हा केल्याच्या तारखेपासून चार वर्षांच्या कालावधीनंतर दाखल करण्यात आली होती आणि सबब महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ चे नियम २७ (३) द्वारे ते मुदतमर्यादे बाहेर आहे, या आधारावर उत्तरवादींनी रिट मध्ये उच्च न्यायालयासमोर उक्त कार्यवाहीला आव्हान दिले. सदर रिट याचिका मंजूर करण्यात आली आणि कार्यवाही रद्द करण्यात आली. त्यामुळे हे अपील करण्यात आले आहे.

अपीलकर्त्याने असा युक्तिवाद केला की निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २७ चा फौ. प्र. सं. च्या तरतुदींवर प्रभाव पडू शकत नाही. असा युक्तिवादही करण्यात आला की निवृत्तिवेतन नियमांचा नियम २७ फौजदारी न्यायालयातील खटल्याला लागू होत नाही.

अपील मंजूर करताना न्यायालयाने

असा निर्णय दिला कि : १.१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४ मध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की भा. दं. वि. अंतर्गत सर्व गुन्ह्यांचा तपास केला जाईल, चौकशी केली जाईल, खटला चालवला जाईल आणि त्यात असलेल्या तरतुदींनुसार हाताळला जाईल. हे मान्य आहे की, उत्तरवादी क्र. १ विरुद्ध भा. दं. वि. आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९४७ अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी आरोपपत्र दाखल केले गेले आहे आणि त्याच्यावर फौ. प्र. सं. अंतर्गत विहित केलेल्या प्रक्रियेनुसार खटला चालवला जाणार आहे. [२६४- बी -सी ]

१.२. फौ. प्र. सं. च्या प्रकरण XXXVI मधील कलम ४६७ ते कलम ४७३ हे गुन्ह्यांची दखल घेण्याच्या मुदतमर्यादेवर कार्यवाही करते. कलम ४६८ मध्ये उपकलम २ अंतर्गत विहित केलेल्या मुदतमर्यादेचा कालावधी संपल्यानंतर गुन्ह्याची दखल घेण्यास रोध घालण्याची तरतूद आहे. एक वर्षापेक्षा जास्त परंतु तीन वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा होऊ न शकणाऱ्या गुन्हया साठी तीन वर्षांच्या कालावधीची तरतूद आहे. जर गुन्हा तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, तर फौ. प्र. सं. अंतर्गत कोणतीही मुदत निश्चित केलेली नाही. पुढे कलम ४७० च्या उपकलम ३ मध्ये मंजुरी मिळवण्यासाठी लागणारा वेळ वगळण्यात आला आहे, जेथे एखाद्या गुन्ह्यासाठी खटला चालवण्यासाठी सरकारची किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाची पूर्वीची मंजुरी आवश्यक

आहे. त्यामुळे, वरवर पाहता असे दिसते की ज्या गुन्ह्यांसाठी उत्तरवादी क्र. १ वर आरोपपत्र दाखल केले गेले आहे, ते तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्याने, फौ. प्र. सं. कलम ४६८ अंतर्गत कोणत्याही मुदतीचा कालावधी विहित केलेला नाही. कोणत्याही परिस्थितीत, जेथे मुदतमर्यादेचा कालावधी विचारात घेणे आवश्यक आहे, तर कलम ४७० च्या उपकलम ३ मध्ये खटला चालवण्यासाठी पूर्वीची मंजुरी मिळविण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळण्यात आला आहे. सध्याच्या प्रकरणात, दि. २५/०८/१९८९ रोजी खटला चालवण्याची मंजुरी मिळवण्यात आली होती. म्हणून, जर मुदतमर्यादेचा कालावधी लागू असेल तर मंजुरी मिळविण्यासाठी लागणारा वेळ वगळला पाहिजे. सबब, उत्तरवादी विरुद्ध दाखल केलेला खटला कोणत्याही मुदतमर्यादेच्या बाहेर आहे असे म्हटले जाऊ शकत नाही. [२६४- बी, सी, एफ, जी, एच; २६५-ए]

२.१. सरकारी कर्मचाऱ्यावर त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी खटला चालवला जावा की नाही हे स्पष्टपणे सेवेच्या अटींशी संबंधित असल्याचे काहीतरी मानले जाऊ शकत नाही; म्हणून, अशी तरतूद करणे की सरकारी कर्मचारी, जरी तो गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणाचा दोषी असला तरीही त्यास कार्यक्षम काम करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यास भा. दं. वि. किंवा भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा किंवा तत्सम कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हा केला असला तरीही, विशिष्ट कालावधी संपल्यानंतर त्यांच्याविरुद्ध खटला चालविण्यापासून सूट दिली जावी, हे केवळ सार्वजनिक धोरणाच्या विरोधात नाही तर उद्दिष्टप्राप्तीत अडथळा आणणारे देखील ठरेल. सेवेच्या शर्ती म्हणून खटला चालवण्यावर अधिरोध घालून संविधानाच्या अनुच्छेद ३०९ अंतर्गत नियम तयार करून अशी स्थितिविशेष निर्माण केली जाऊ शकत नाही. [२६७- जी, एच.; २६८-ए]

*पंजाब राज्य – विरुद्ध - कैलाश नाथ,* [१९८९] १ एस. सी. सी. ३२१ आणि *प्रभाकर गोविंद सावंत – विरुद्ध - महाराष्ट्र राज्य आणि इतर,* (१९९१) महाराष्ट्र लॉ जर्नल १०५१, यावर भर दिला.

२.२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७(१) मध्ये निवृत्तिवेतन रोखण्याचा किंवा काढून घेण्याचा सरकारचा अधिकार आहे आणि त्या संदर्भात सदर नियमाचा अर्थ लावण्यात यावा. कोणत्याही विभागीय किंवा न्यायालयीन कार्यवाहीत

**निवृत्तिवेतनधारक त्याच्या नोकरी कालावधीत गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणाचा दोषी आढळल्यास, सदर नियमांनुसार, सरकार इतर गोष्टींबरोबरच निवृत्तिवेतन किंवा त्याचा कोणताही भाग रोखण्याचा किंवा काढून घेण्याचा आदेश देऊ शकते. कोणत्याही विभागीय किंवा न्यायालयीन कार्यवाहीत निवृत्तिवेतनधारक त्याच्या नोकरी कालावधीत गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणासाठी दोषी आढळल्यास सरकारला झालेल्या कोणत्याही आर्थिक हानि संपूर्ण किंवा काही भागाकरिता अशा निवृत्तिवेतनातून वसुलीचे आदेश देण्याचे अधिकारही हे नियम सरकारला देते. जर कर्मचाऱ्याला देय असलेल्या निवृत्तिवेतनातून काही वसूल करायचे असेल तर उप-नियम २ किंवा ३ अंतर्गत विहित केलेल्या कालावधीत न्यायिक कार्यवाही किंवा विभागीय चौकशी सुरू करणे आवश्यक आहे परंतु यामुळे गंभीर गैरवर्तनाच्या गुन्ह्यासाठी खटला चालवण्यापासून अभियोग संस्थेला प्रतिरोध करणार नाही. हा नियम आधीचा नियम २६ सोबत वाचला पाहिजे ज्यामध्ये अशी तरतूद आहे की भविष्यातील चांगले वर्तन ही निवृत्तिवेतनाच्या प्रत्येक अनुदानाची एक निहित अट असेल आणि निवृत्तिवेतनधारक गंभीर गुन्ह्यासाठी दोषी ठरल्यास किंवा गंभीर गैरवर्तनासाठी दोषी आढळल्यास सरकार निवृत्तिवेतन किंवा त्याचा काही भाग रोखू किंवा काढून घेऊ शकते. परंतु निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २६ आणि २७ मध्ये खटला चालवण्यासाठी कोणत्याही मुदतमर्यादेचा कालावधी दिलेला नाही किंवा फौ. *प्र. सं.* अंतर्गत निर्धारित केलेल्या मुदतमर्यादेच्या कालावधीची जागा घेऊ शकत नाही. नियम २७ हा मात्र निवृत्तिवेतन देणे, रोखणे किंवा काढून घेणे या उद्देशाने आहे आणि त्यामुळे त्याचे कार्य सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन देणे किंवा रोखणे या क्षेत्रात मर्यादित असेल. राज्य सरकारने तयार केलेल्या निवृत्तिवेतन नियमांमध्ये कोणत्याही तरतुदी असल्या तरी, फौ. *प्र. सं.* च्या तरतुदींचा प्रभाव वरचढ असेल आणि ते प्रभावी ठरेल.[२६७-एफ, जी, एच; २६८-ए-ई]**

फौजदारी अपील अधिकारिता : फौजदारी अपील क्र. ११६९/१९९९.

फौजदारी रित याचिका क्र . ४८४/१९९१ मधील मुंबई उच्च न्यायालयाने दि. १८/०९/१९९८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी गोपाल बलवंत साठे.

उत्तरवादी क्र. १ साठी अजय मजिठिया आणि यशपाल ढींगरा.

न्यायालयाचा न्यायनिर्णय **शाह न्यायमूर्ती** यांनी दिला.
अनुज्ञा देण्यात आली.

उत्तरवादी क्र.१ हा महाराष्ट्र राज्यात पी. डब्ल्यू. डी. मध्ये उप अभियंता, म्हणून कार्यरत होता. दि. १३ ऑक्टोबर १९९० रोजी, उत्तरवादी आणि विभागाच्या इतर अनेक अधिकाऱ्यांविरुद्ध सातारा येथील विशेष न्यायालयासमोर आरोपपत्र क्र. २४७/१९९० दाखल करण्यात आले आणि या प्रकरणाला विशेष खटला क्र. ५/१९९० देण्यात आले. उत्तरवादी ३१ डिसेंबर १९८७ रोजी उप अभियंता म्हणून निवृत्त झाला. भा. दं. वि. चे कलम १२०-बी, ४०६, ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७७ व १०९ सोबत भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७ चे कलम ५(१)(सी) (*डि*) सह ५(२) अंतर्गत गुन्ह्यांसाठी उत्तरवादी वर खटला चालवण्यासाठी आवश्यक मंजुरी प्राप्त करण्यात आली. विशेष न्यायालयाच्या न्यायाधीशांनी गुन्ह्यांची दखल घेतली आणि उत्तरवादी विरुद्ध आदेशिका जारी केली.

त्यानंतर उत्तरवादी याने त्याच्यावर केलेली फौजदारी कारवाई गुन्हा घडल्यानंतर ४ वर्षांनी दाखल केली असलयाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ (यापुढे निवृत्तीवेतन नियम म्हणून संदर्भित)च्या कलम २७ नुसार अवरोधित करते सबब या आधारावर केलेली कारवाई रद्द करण्यात यावी म्हणून मुंबई उच्च न्यायालयापुढे फौजदारी रीट पिटिशन क्र. ४८४/१९९१ दाखल केले. उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद स्वीकारला आणि असे म्हटले की निवृत्तिवेतन नियमांचा नियम २७ थेट लागू होतो आणि गुन्हा केल्याच्या तारखेपासून चार वर्षांच्या आत खटला सुरू करणे अनिवार्य आहे. त्यामुळे न्यायालयाने रिट याचिका मंजूर केली आणि उत्तरवादी विरुद्ध विशेष खटला क्र. ५/१९९० मधील कार्यवाही रद्द केली. विद्वान एकल न्यायाधीशच्या सदर न्यायनिर्णयाला आता आव्हान दिले जात आहे.

उपरोक्त नियमाच्या आधारे, अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने सादर केले की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी (थोडक्यात "फौ. *प्र. सं.*") लक्षात घेता, निवृत्तिवेतन नियम २७ मध्ये समाविष्ट असलेला रोध लागू केला जाऊ शकत नाही आणि त्याचा संहितेच्या तरतुदींवर कोणताही अधिभावी प्रभाव पडू शकत नाही. गुणवत्तेच्या आधारावरही, खटला

चालवण्याची मंजुरी दि. २५ ऑगस्ट १९८९ रोजी प्राप्त झाली आणि यासाठी सुद्धा दि. ३० ऑक्टोबर १९९० रोजी न्यायालयात आरोपपत्र वेळेच्या आत सादर करण्यात आले. निवृत्तिवेतन नियमांचा नियम २७ फौजदारी न्यायालयात खटला चालवण्यासाठी लागू होणार नाही, असा पर्यायी युक्तिवाद करण्यात आला.

आमच्या मते, अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने उपस्थित केलेल्या युक्तिवादावर विचार करणे आवश्यक आहे. फौ. *प्र. सं.* चे कलम ४ मध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की भारतीय दंड संहिता अंतर्गत सर्व गुन्ह्यांचा तपास केला जाईल, चौकशी केली जाईल, खटला चालवला जाईल आणि अन्यथा त्यात असलेल्या तरतुदींनुसार हाताळल्या जाईल. मान्य आहे की, उत्तरवादी क्र.१ विरुद्ध भारतीय दंड संहिता संहिता आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी आरोपपत्र दाखल केले जाते आणि त्याच्यावर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत विहित केलेल्या प्रक्रियेनुसार खटला चालवला गेला. फौ. प्र. सं. च्या प्रकरण XXXVI मधील कलम ४६७ ते कलम ४७३ हे गुन्ह्यांची दखल घेण्याच्या मुदतीवर कार्यवाही करते. कलम ४६८ मध्ये उपकलम २ अंतर्गत विहित केलेल्या मुदतीचा कालावधी संपल्यानंतर गुन्ह्याची दखल घेण्यास मर्यादा घालण्याची तरतूद आहे.

"४६८ (२) मुदतमर्यादा ---

(ख) अपराध जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास, एक वर्ष;

(क) अपराध द्रव्यदंडाच्याच शिक्षेला पात्र असल्यास, सहा महिने;

(ग) अपराध एक वर्षाहून अधिक, पण जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास, तीन वर्षे, इतकी असेल."

जर गुन्हा तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, तर फौ. प्र. सं. अंतर्गत कोणतीही मुदतमर्यादा निश्चित केलेली नाही. पुढे कलम ४७० च्या उपकलम ३ मध्ये मंजुरी मिळवण्यासाठी लागणारा वेळ वगळण्यात आला आहे, जेथे एखाद्या गुन्ह्यासाठी खटला चालवण्यासाठी सरकारची किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाची पूर्वीची मंजुरी आवश्यक आहे. त्यामुळे, वरवर पाहता असे दिसते की ज्या गुन्ह्यांसाठी उत्तरवादी क्र. १ वर आरोपपत्र दाखल केले गेले आहे, ते तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या कारावासाच्या

शिक्षेस पात्र असल्याने, फौ. प्र. सं. कलम ४६८ अंतर्गत कोणत्याही मुदतमर्यादेचा कालावधी विहित केलेला नाही. कोणत्याही परिस्थितीत, जेथे मुदतमर्यादेचा कालावधी विचारात घेणे आवश्यक आहे, तर कलम ४७० च्या उपकलम ३ मध्ये खटला चालवण्यासाठी पूर्वीची मंजुरी मिळविण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळण्यात आला आहे. सध्याच्या प्रकरणात, दि. २५/०८/१९८९ रोजी खटला चालवण्याची मंजुरी मिळवण्यात आली होती. म्हणून, जर मुदतमर्यादेचा कालावधी लागू असेल तर मंजुरी मिळविण्यासाठी लागणारा वेळ वगळला पाहिजे. सबब, उत्तरवादी विरुद्ध दाखल केलेला खटला कोणत्याही मुदतमर्यादेच्या बाहेर आहे असे म्हटले जाऊ शकत नाही.

पुढील प्रश्न असा आहे की - निवृत्तिवेतन नियमांचा काय परिणाम होईल जे मुदतमर्यादेचा कालावधी विहित करतात? पक्षांच्या विद्वान वकिलांनी केलेल्या युक्तिवादांचा विचार करण्यासाठी, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ च्या संबंधित भागाचा संदर्भ घेणे आवश्यक आहे, जो खालीलप्रमाणे आहेः

"२७. निवृत्तिवेतन रोखून ठेवण्याचा किंवा काढून घेण्याचा शासनाचा अधिकार

(१) निवृत्तिवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत, तसेच सेवानिवृत्त होऊन पुनर्नियुक्तीनंतरच्या त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभीर गैरवर्तणुकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्याचे कोणत्याही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, शासनाला लेखी आदेशाद्वारे, निवृत्तिवेतन किया त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल; आणि शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुली देखील अशा निवृत्तिवेतनातून पूर्णतः किंवा अंशतः करण्याचा शासन आदेश देईल :

मात्र ........

आणखी असे की ........

(२) (ए) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किवा पुनर्नियक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुद्ध पोटनियम (१) मध्ये उल्लेखिलेली विभागीय कार्यवाही सुरू करण्यात आली असेल तर, ती कार्यवाही शासकीय कर्मचाऱ्याच्या अंतिम

निवृत्तीनंतर, या नियमाखालील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि शासकीय कर्मचारी सेवेत राहिला असता तर, ज्या पद्धतीने ती चालू ठेवण्यात आली असती त्याच पद्धतीने ती, ज्या प्राधिकाऱ्याने सुरू केली त्याच्याचकडून चालू ठेवली जाईल व समाप्त केली जाईल.

(बी) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुद्ध विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर-

(एक) शासनाच्या मंजुरीशिवाय ती चालू केली जाणार नाही,

(दोन) अशी कार्यवाही सुरू करण्यापूर्वीच्या चारापेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता कामा नये, आणि

(तीन) शासन निदेशित करील अशा प्राधिकाऱ्याकडून व अशा ठिकाणी आणि ज्या विभागीय कार्यवाहीमध्ये शासकीय कर्मचारी सेवेत असताना त्याच्या बडतर्फीचा आदेश देता येईल अशा विभागीय कार्यवाहीच्या पद्धतीनुसार चालवण्यात येईल.

(३) जर शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियक्त झाल्यानंतर, सेवेत असताना त्याच्याविरुद्ध एखादी न्यायिक कार्यवाही सुरू केलेली नसेल तर, अशी कोणतीही न्यायिक कार्यवाही, ती सुरू करण्यापूर्वी चारपेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत उद्भवलेल्या वादकारणासंबंधात किंवा घडलेल्या घटनेसंबंधात, सुरू केली जाणार नाही.

(४) ............

(५) ...............

(६) ..............”

अशाच प्रकारचा युक्तिवादा चा परामर्श या न्यायालयाने पंजाब राज्य - विरुद्ध - कैलाश नाथ, [१९८९] १ एस. सी. सी. ३२१ मध्ये घेतला होता, ज्यामध्ये या नियमासारख्याच पंजाब नागरी सेवा नियमा चे सेवा नियम २.२ वर न्यायालयाने विचार केला. न्यायालयाने

असा निर्णय दिला कि सरकारी कर्मचाऱ्यावर त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी खटला चालवला जावा की नाही हे स्पष्टपणे सेवेच्या अटींशी संबंधित असल्याचे काहीतरी मानले जाऊ शकत नाही; म्हणून, अशी तरतूद करणे की सरकारी कर्मचारी, जरी तो गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणाचा दोषी असला तरीही त्यास कार्यक्षम काम करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यास भा. दं. वि. किंवा भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा किंवा तत्सम कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हा असला तरीही, विशिष्ट कालावधी संपल्यानंतर त्यांच्याविरुद्ध खटला चालविण्यापासून सूट दिली जावी, हे केवळ सार्वजनिक धोरणाच्या विरोधात नाही तर उद्दिष्टप्राप्तीत अडथळा आणणारे  देखील ठरेल. सेवेच्या शर्ती म्हणून खटला चालवण्यावर बंदी घालून संविधानाच्या अनुच्छेद ३०९ अंतर्गत नियम तयार करून अशी स्थितिविशेष निर्माण केली जाऊ शकत नाही.

न्यायालयाने पुढे (परिच्छेद ११ व १२ मध्ये) असा निर्णय दिला कि:

> "(११) ...... सेवेदरम्यान गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणासाठी सेवानिवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यावर खटला चालवण्यावर संपूर्ण किंवा सामान्य अवरोध असलेला नियम जर अनुच्छेद ३०९ अंतर्गत सेवेच्या अटी घालण्याच्या कक्षेत येत नसेल, तर असा नियम अनुच्छेद  ३०९ अंतर्गत सत्तेच्या कथित वापरात एकतर नियमाच्या मुख्य उपवाक्यात किंवा त्यातील परंतुकात समाविष्ट करून केले जाऊ शकत नाही. वर जे सांगितले गेले आहे ते लक्षात घेऊन आणि अनुच्छेद ३०९ अंतर्गत नियम बनविण्याच्या अधिकाराची व्याप्ती लक्षात घेऊन, नियम २.२ च्या तिसऱ्या तरतुदीचा सरकारी कर्मचाऱ्यावर खटला चालवल्यास, जर त्यात नमूद केलेल्या अटी पूर्ण झाल्या असतील तर संपूर्ण किंवा सामान्य अवरोध लावला जाऊ शकत नाही. जरी पहिले मत असे असेल की, हा नियम अशा प्रकारचा अवरोध आणत असल्याचे दिसत असले, तरी ज्या  उद्देशासाठी अशी तरतूद करण्यात आली होती, त्याला निराश न करता, एखाद्या तरतुदीचे वाचन करण्यास सुस्थापित नियमाचा अवलंब करून त्याचा अर्थ लावला पाहिजे, जेणेकरून ती त्याच्या  सत्तेच्या स्त्रोताच्या चौकटीत आणली जाऊ शकेल.
>
> नियम २.२ चा खंड (बी), मुख्य उपवाक्य म्हटले जाऊ शकते,  तो निवृत्तिवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत, तसेच सेवानिवृत्त होऊन पुनर्नियुक्तीनंतरच्या

त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभीर गैरवर्तणुकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्याचे कोणत्याही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, शासनाला लेखी आदेशाद्वारे, निवृत्तिवेतन किया त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल; आणि शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुली देखील अशा निवृत्तिवेतनातून पूर्णतः किंवा अंशतः करण्याचा शासनाचा आदेश देण्याचा अधिकार राखून ठेवतो.

(१२) त्यातील तिसऱ्या परंतुकांचा उद्देश, परंतुकांच्या व्याप्तीप्रमाणे, जर परंतुकाद्वारे योजलेल्या अटी पूर्ण झाल्या असतील तर मुख्य उपवाक्याद्वारे सरकारला प्रदान केलेल्या अधिकाराला अपवाद तयार करणे हा आहे. हा उद्देश साध्य केला जाऊ शकतो, जर वाचनाचा नियम स्वीकारून उक्त तरतुदीचा अर्थ असा लावला गेला की जरी एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यावर खटला चालवला गेला आणि कारवाईचे कारण किंवा अशा संस्थेपूर्वी चार वर्षांपेक्षा जास्त काळापूर्वी घडलेल्या घटनेच्या संदर्भात दाखल केलेल्या न्यायालयीन कारवाईत त्याला शिक्षा झाली, तरी अशा सरकारी कर्मचाऱ्याच्या निवृत्तिवेतनासंदर्भात खंड (ब) मध्ये समाविष्ट असलेल्या मुख्य तरतुदीद्वारे त्याला देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्याचा सरकारला अधिकार राहणार नाही."

त्याचप्रमाणे, सध्याच्या प्रकरणात, नियम २७(१) मध्ये निवृत्तिवेतन रोखण्याचा किंवा काढून घेण्याचा सरकारचा अधिकार आहे आणि त्या संदर्भात सदर नियमाचा अर्थ लावण्यात यावा. कोणत्याही विभागीय किंवा न्यायालयीन कार्यवाहीत निवृत्तिवेतनधारक त्याच्या नोकरी कालावधीत गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणाचा दोषी आढळल्यास , सदर नियमांनुसार, सरकार इतर गोष्टींबरोबरच निवृत्तिवेतन किंवा त्याचा कोणताही भाग रोखण्याचा किंवा काढून घेण्याचा आदेश देऊ शकते. कोणत्याही विभागीय किंवा न्यायालयीन कार्यवाहीत निवृत्तिवेतनधारक त्याच्या नोकरी कालावधीत गंभीर गैरवर्तन किंवा निष्काळजीपणासाठी दोषी आढळल्यास सरकारला झालेल्या कोणत्याही आर्थिक हानि संपूर्ण किंवा काही भागाकरिता अशा निवृत्तिवेतनातून वसुलीचे आदेश देण्याचे अधिकारही हे

सरकारला देते. जर कर्मचाऱ्याला देय असलेल्या निवृत्तिवेतनातून काही वसूल करायचे असेल तर उप-नियम २ किंवा ३ अंतर्गत विहित केलेल्या कालावधीत न्यायिक कार्यवाही किंवा विभागीय चौकशी सुरू करणे आवश्यक आहे परंतु यामुळे गंभीर गैरवर्तनाच्या गुन्ह्यासाठी खटला चालवण्यापासून अभियोग संस्थेला प्रतिरोध करणार नाही. हा नियम आधीचा नियम २६ सोबत वाचला पाहिजे ज्यामध्ये अशी तरतूद आहे की भविष्यातील चांगले वर्तन ही निवृत्तिवेतनाच्या प्रत्येक अनुदानाची एक निहित अट असेल आणि निवृत्तिवेतनधारक गंभीर गुन्ह्यासाठी दोषी ठरल्यास किंवा गंभीर गैरवर्तनासाठी दोषी आढळल्यास सरकार निवृत्तिवेतन किंवा त्याचा काही भाग रोखू किंवा काढून घेऊ शकते. परंतु निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २६ आणि २७ मध्ये खटला चालवण्यासाठी कोणत्याही मुदतमर्यादेचा कालावधी दिलेला नाही किंवा फौ. *प्र. सं.* अंतर्गत निर्धारित केलेल्या मुदतमर्यादेच्या कालावधीची जागा घेऊ शकत नाही. नियम २७ हा मात्र निवृत्तिवेतन देणे, रोखणे किंवा काढून घेणे या उद्देशाने आहे आणि त्यामुळे त्याचे कार्य सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन देणे किंवा रोखणे या क्षेत्रात मर्यादित असेल.

कैलाश नाथ (सुप्रा) या प्रकरणातील निर्णयावर अवलंबून, प्रभाकर गोविंद सावंत – विरुद्ध - महाराष्ट्र राज्य आणि इतर, (१९९१) महाराष्ट्र लॉ जर्नल १०५१, या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी, हा युक्तिवाद फेटाळून लावला कि, निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २७ अंतर्गत खटला चालवण्यास अवरुद्ध करण्यात आला होता, कारण तो चार वर्षांच्या कालावधीनंतर सुरू करण्यात आला होता. त्या प्रकरणात, विद्वान न्यायाधीशांनी संविधानाच्या अनुच्छेद २५४ चा संदर्भ दिला आणि असा निर्णय दिला कि निवृत्तिवेतन नियमांमधील कोणत्याही तरतुदी राज्य सरकारने तयार केलेल्या असूनही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदींचा त्या नियमांवर अधिभावी प्रभाव असेल आणि ते नियम अभिभावी ठरेल. हे दुर्दैवी आहे की, विद्वान एकल न्यायाधीशाचे लक्ष या निर्णयांकडे वेधले गेले नाही जे उच्च न्यायालयाशी संबंधित आहे तितपत बंधनकारक स्वरूपाचे होते. याशिवाय, केवळ निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २७ वर आधारित निष्कर्षावर जाण्याऐवजी एकल न्यायाधीशांनी गंभीर गुन्ह्यांच्या संदर्भात फौजदारी खटला रद्द करण्यापूर्वी फौ. *प्र. सं.*च्या संबंधित तरतुदींची तपासणी करायला हवी होती.

परिणामी, अपील मंजूर करण्यात आले. रिट पेटिशन क्र. ४८४/१९९१ मध्ये दि. १८/०९/१९९८ रोजी उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित न्यायनिर्णय रद्दबातल केला व रद्द ठरविण्यात आला. ट्रायल कोर्टाला या प्रकरणात पुढे जाण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आर. सी. के

अपील मंजूर करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."